VPM's B. N. BANDODKAR COLLEGE OF SCIENCE, THANE
F.Y.J.C 2nd Mid Term Examination January - 2020
Subject :-Marathi

Date :-13/01/2020 **Time :- 04.00 p.m. TO 05:00 p.m.**
Day :-Monday **Total Marks :- 25**

कृतिपत्रिकेसाठी सूचना

१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलने काढाव्यात.
२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन याकडे जाणीव पूर्वक लक्ष द्यावे.

विभाग - १ ०६

कृती.१ खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ०१

१)

मामू काम करत असलेली शाळा या परीक्षांचे केंद्र आहे.

ही शाळा सरकारी आहे. इथं ड्रॉईंगच्या, कॉमर्सच्या सरकारी सर्टिफिकेटच्या परीक्षांचं केंद्र आहे. या परिक्षा आल्या, की बुढा मामू पाखरागत हालचाली करू लागतो. नंबर टाकणं. बाकडी हालवून बैठकीची व्यवस्था करणं, पाणी देण्यासाठी गोरगरिबांची पोरं ऑफिसात आणून दाखल करणं. पडेल ते काम मामू उत्साहानं करू लागतो.

कधी खेळताना, कधी प्रार्थनेच्या वेळेला एखादं पोरगं चक्कर येऊन कोसळतं. रिक्षा आणून, त्यात त्या पोराला घालून डॉक्टरकडं नेताना मामू त्याला आईच्या मायेने धीर देत म्हणतो, "घाबरू नकोस, ताठ बस. काय झालं न्हाई तुला."

सव्वीस जानेवारी, पंधरा आगॅस्ट या राष्ट्रीय दिवशी कधी कधी मामूच्या हातानं इथला राष्ट्रध्वज, दंडावर सरसरत चढतो. शाळेच्या तिस-या मजल्यावरच्या माथ्यावर निकोप वा-यावर फडफडत राहतो. फेटयाजवळ हाताचा पंजा भिडवून मामू राष्ट्रगीत संपेपर्यंत ध्वजाकडं मान उंचावून बघत राहतो.

२) ०२



३) 'माणसापेक्षा माणुसकी फार फार मोठी आहे!' या विधानातील आसयसौंदर्य तुमच्या शब्दांत लिहा ०३

०६

विभाग - २

कृती - २ खालील कवितेच्याआधारे सूचनेनुसार कृती करा. ०१

१) ०२



२)



जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥ धृ.॥

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति- संपदांची
स्वतंत्रते भगवति ! श्रीमती राज्ञी तूं त्यांची

परवशतेच्या नभांत तूंची आकाशी होशी
स्वतंत्रते भगवति ! चांदणी चमचम लखलखशी
गालावरच्या कुसुमीं किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवति ! तूच जी विलसतसे लाली

तूं सूर्याचे तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवति ! अन्यथा ग्रहण नष्ट तेंची

मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपे तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवति ! योगिजन परब्रह्म वदती
जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवति ! सर्व तव सहचारी होतें
हे अधम -रक्त-रंजिते | सुजन-पूजिते | श्रीस्वतंत्रते
तुजसाठिं मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण
भरतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे

३) ०१



४) शब्दांचे अर्थ लिहा. ०२

१) कुसुम ⟶ ३) उदात्त

२) चराचर ⟶ ४) गांभीर्य

विभाग - ३ ०७

कृती. ३ अ) खालील नाटयकृतीच्या आधारे सूचने नुसार कृती करा.

१) ०२



आम्हांला कुठल्याही दिव्याचं काही वाटत नाही. तो मघाचा फोटोचा दिवा मात्र सहन होत नाही. तो फाजील कार्टा इथे आला तर त्याला कानपटीत सांगतो.

मोनिका : पुन्हा नाही येणार तो. कृष्णराव,आम्ही काही आपल्या भूमिका पाहिलेल्या नाहीत. आपल्या भूमिकांविषयी सांगा ना आम्हांला.

कृष्णराव : (हातातली काठी माईक समजून) सांगतो हं. भूमिका तशा मी खूप केल्यात. हॅलो हॅलो (चूक लक्षात येते. काठी बाजूला करून) गडक-यांच्या, खाडिलकरांच्या,देवलांच्या नाटकात. पण माझी विशेष गाजलेली भूमिका म्हणजे-कृष्णाची.

मोनिका : सौभद्र मधली .....

कृष्णराव : हो. सौभद्र नाटकातला कृष्ण. अहो, त्यावरून मला कृष्णराव नाव पडलं. गोपाळ गणेश आगरकरांनी दिलं. म्हणजे टिळकांनी नारायण राजहंसाला बालगंधर्व नाव दिल्याचं आगरकरांना कळलं. दोघांमध्ये मतभेद होते. तावडतोव आगरकरांनी मला कृष्णराव नाव देऊन टाकलं. टिळकांना कळायच्या आत. 'सुधारक' पत्रामध्ये अग्रलेख लिहिला. लोकहो याला कृष्णराव म्हणा. माझं मूळचं नाव विठू

मोनिका : सौभद्रचे किती प्रयोग केलेत ?

कृष्णराव : इथे हिशेब कोणी ठेवयाल? लोकांचं रंजन करणं हा मुख्य हेतू. लोक अगदी मश्गूल होऊन जायचे पहाटेपर्यंत. एकेका गाण्याला सहा-सहा वेळा वन्समोअर घेत असे मी. रूक्मिणीची भूमिका करणारा आमचा पांडू शिवलीकर, एकदा एका पायावर तर एकदा दुस-या पायावर असा ताटकळत उभा..... टोचायचा मला मागून. पुरे,पुरे, किती गातोस. किती गातोस म्हणून. (हसतात.)

३) नाटक करण्यामागे कृष्णरावांचा हेतू → [ ] ०१

४) ०२



५) टिळकांनी नारायण राजहंसाला [ ] नाव दिल. ०१

कृती.३ ब) **खालील कृती सोडवा** ०६

मुद्रितशोधन स्वरूप- मुद्रितशोधकाचे महत्व - मुद्रितशोधकाची भूमिका

किंवा

मुद्रितशोधनासाठी आवश्यक ज्ञान कौशल्ये - मुद्रितशोधकाची साधनसामग्री - मुद्रितशोधनाचे तंत्र